REVIEW OF RESEARCH

# नोबेल अर्थशास्त्रज्ञ :– डॉ. अमर्त्य सेन

डॉ. सुदाम कडूजी कोरडे

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नवापूर, ता. नवापूर जि. नंदुरबार.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना :–

ज्या परिसरात मनुष्य जन्माला येतो त्या परिसराचा त्याच्यावर व त्याचे भावी व्यक्तीमत्व घडविण्यावर नक्कीच परिणाम होत असणार असे अमर्त्य सेन यांच्या उदाहरणारून तरी म्हणता येईल. अमर्त्य सेन यांचा जन्म 3 नोव्हेंबर 1933 रोजी झाला. त्यांचा जन्म झाला तो परिसर म्हणजे पश्चिम बंगालमधील रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन आणि विश्वभारतीचा परिसर होय. अमर्त्य सेन यांच्या बरोबर 20 वर्षापूर्वी म्हणजे1913 मध्ये रविंद्रनाथाना साहित्यासाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर 85 वर्षांनी म्हणजे 1998 मध्ये त्या भूमीत जन्मलेल्या अमर्त्य सेनाना अर्थशास्त्रातील हा पुरस्कार मिळाला अमर्त्याची आई अमिता सेन ह्या शांतिनिकेतनच्या विद्यार्थीनी रविंद्रनाथाची हुशार विद्यार्थीनी खुद्द रविंद्रनाथांनी नामकरण सोहळयाच्या दिवशी (बारशाला)सेन घराण्याच्या या कुलदीपकांचे अमर्त्य नाव ठेवले व हा मुलगा ज्ञात जगाच्या पलीकडे जाईल आणि एक दिवस असामान्य माणूस म्हणून नावारूपाला येईल. असा आशिर्वाद दिला. गुरूदेवाच्या आाशिर्वादाची भविष्यवाणी खरी ठरली.

1998 ते 2007 या दशकातील, स्वीडनच्या मध्यवर्ती बॅंकेतून आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे अर्थशास्त्रातील 1998 चे नोबेल पारितोषिक इंग्लडमधील परंतु भारतीय नागरिकत्व असलेले सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. डॉ. अमर्त्य सेन यांना जाहीर झाले आणि 10 डिसेंबर 1998 रोजी स्टॉकहोम (स्वीडन) येथे समारंभपूर्वक बहाल करण्यात आले. त्यांना हे पारितोषिक त्यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राबाबत केलेल्या त्यांच्या योगदानाबदल देण्यात येत आहे. (For this Contribution to welfare economics) सर्व भारतीयांना अभिमान वाटावा असाच हा सन्मान आहे. केवळ भारतीयांनाच काय पण संबंध खंडालाच अभिमान वाटावा अशी ही घटना आहे. कारण अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळवणारे या खंडातले ते पहिले अर्थशास्त्रज्ञ.

डॉ. सेन 1957 मध्ये केब्रिजला परत आले व त्याच्या कॉलेजमध्ये फेलो म्हणून रुजू झाले ही फिलोशीप चार वर्षासाठी होती व त्या काळास त्यांनी त्याच्या आवडीचे काम वा अभ्यास करण्याची मुभा होती. **सेन यांनी तत्वज्ञान–नैतिक आणि राजकिय या विषयाच्या अभ्यासाला वाहुन घेतले.** त्याचा प्रबंध तीन वर्षाच्या मुदतीनंतर विद्यापीठाला दिला गेला व त्यांना 1958–59 मध्ये पी.एच.डी. पदवी मिळाली म्हणजे वयाच्या पंचविशीतच त्यांनी ही सर्वोच्च पदवी मिळविली. अमर्त्य सेन यांनी आपल्या कारकिर्दीत ट्रिनिटीत त्या सहा वर्षातील फेलोशिप पूर्ण करुन 1963 मध्ये ते परत भारतात आले. 1963 ते 1971 अशी 8 वर्ष त्यांनी दिली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. सन 1971 मध्ये परत इंग्लंडला गेले. तिथे त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये सहा वर्ष प्राध्यापक म्हणून नोकरी सांभाळल्यानंतर 1977 मध्ये ऑक्सफर्डच्या नकिल महाविद्यालयात तीन वर्ष प्राध्यापकपद सांभाळले. 1980 मध्ये

ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांची डयुमॉड प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स या मानाच्या पदावर त्यांची नियुक्ती केली. 1987 पर्यंत हे पद सांभाळल्यानंतर ते अमेरिकेत गेले. तेथे हार्वर्ड विद्यापीठाने त्यांची लॅमॉट प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स ऑड फिलॉसॉफी म्हणून नेमणूक केली. हे पद 11 वर्ष सांभाळल्यानंतर 1989 मध्ये इंग्लंडमधील ते विद्यार्थी असलेल्या ट्रिनिटी महाविद्यालयाचे मास्टर (म्हणजे सर्वेसर्वा प्रमुख ) म्हणून नेमणूक केली. याच वर्षी त्यांना ऑक्टोबरमध्ये नोबेल पारितोषिक जाहीर झाले.

अमर्त्य सेन हे जागतीक कीर्तीचे सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ भारतरत्न व अर्थषास्त्रातील सर्वोच्च नोबेल पुरस्कारांचे मानकरी आहेत. कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक निवडीचा सिध्दांत तसेच दारिद्रयाच्या प्रश्नावर या सारख्या महत्वपूर्ण संशोधनाबदल त्यांना 1998 मध्ये नोबेल पुरस्कार देण्यात आला.

## डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार :–

अमर्त्य सेन यांनी आपल्या विचारामध्ये दुष्काळ, दारिद्रय, उपासमार, आर्थिक विषमता आरोग्य, शिक्षण, स्त्री समानता, लोकशाही राज्यव्यवस्था व वाढती लोकसंख्या इत्यांदींना आर्थिक विकासामध्ये महत्वाचे स्थान दिले आहे.

## कल्याणाचे अर्थशास्त्र :–

डॉ. अमर्त्य सेन यांचा अर्थशास्त्रातील विविध विषय आणि यांच्या अभ्यासांचा आवाका फार मोठा आहे. आणि त्यातील योगदानही मौलिक आहे. परंतु या सर्व योगदानापैकी त्यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदान निवड समितीला सर्वात मोलाचे वाटले आणि त्याबदल त्यांना हे पारितोषिक देण्यात आले.

कल्याणाच्या अर्थशास्त्रातील मुलभूत समस्यावरील संशोधनाला अनेक महत्त्वाच्या बाबतीत सेन यांनी योगदान केले आहे. यात 4 मुद्याचा समावेश आहे.

1) सामाजिक निवडीचा सिध्दांत
2) दारिद्रयाचे निर्देशांक
3) कल्याणाचे निदेशांक
4) सामाजिक निवडीचा सिध्दांत

यापैकी सामाजिक निवडीचा सिध्दांताबाबतचे त्यांचे विश्लेषण त्यांच्या 1971 च्या Collective Choice and Social Welfare या ग्रंथात त्यांनी केले आहे. ॲरो समस्या आणि ॲरो यांचा अशक्यता सिंध्दात यांचे विश्लेषण करुन सेन यांनी असे दाखवून दिले की, काही विशिष्ट परिस्थितीत काही अटीपूर्ण केल्या तर, लोकशाही चौकटीत व्यक्तीस्वातंत्र व व्यक्तीचे हक्क अबाधित ठेवून सुध्दा व्यक्तीच्या पसंतीवरुन सर्व समाजाची सामूहिक निवड ठरविता येणे शक्य आहे.

ॲरो यांच्या अशक्यता सिध्दांताने अर्थशास्त्रातील आदर्शवादी अर्थशास्त्राच्या शाखेच्या प्रगतीत फार मोठी धोंड निर्माण केली होती. ती सेन यांच्या विश्लेषणाने दूर झाली. त्यामुळेच सामाजिक निवडीच्या सिध्दांताची तत्वे अधिक समृध्द झाली.

1971 च्या त्यांच्या ग्रंथात त्यांनी बहुमताचा नियम, व्यक्तिमात्राचे हक्क आणि व्यक्तीचे कल्याण यासारख्या समस्यांचा उहापोह केला असून त्यातील तत्वज्ञानांनुवर्ती प्रकरणांनी आदर्शनुसार आर्थिक विश्लेषणाला एक नविन दिशा दिली आहे.

## दारिद्रय व कल्याणाचे निर्देशांक :–

दारिद्रय व कल्याणाचे फार मोठे योगदान सेन यांनी केले. असे निर्देशांक दोन दृष्टीनी महत्वाचे असतात.

1) देशांतर्गत विविध समाजगटात दारिद्रयाचे प्रमाण आणि कल्याणाचे व उत्पन्नाचे वाटप कसे आहे, त्यात कसे बदल झाले आहेत याचा अभ्यास करण्यासाठी असे निर्देशांक उपयुक्त असतात.

2) निरनिराळया देशामध्ये दारिद्रयाचे प्रमाण किती आहे, कल्याणाचे प्रमाण कसे आहे. याबाबतची तुलना करण्याच्या दृष्टीनेही त्याचा उपयोग होत असतो.

## अ) दारिद्रयाचे निर्देशांक :–

दारिद्रयांचा सर्वसाधारण मापक म्हणजे दारिद्रयरेषेखाली असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण होय. परंतु हा निर्देशांक तसा सदोष व अपूर्ण आहे. सेन यांनी पाच स्वयंसिंध्द तत्वाच्या ( Axioms ) आधारे पुढीलप्रमाणे दारिद्रय निर्देशांक तयार केला.

$$P=H[I+(1-I)G]$$

या समीकरणात P= दारिद्रयाचे प्रमाण, H= दारिद्रयरेषेखालील लोकांचे प्रमाण, I= उत्पन्नातील तफावत व G= गिनीसहगुणक

हा निर्देशांक केव्हा आणि कसा वापरावा हे त्यांनी स्पष्ट केले आणि तुलनेसाठी सुध्दा त्याचा वापर करता येईल याची ग्वाही दिली. अगदी गरीब देशामध्येही, की जेथे माहिती आणि आकडेवारी अपुरी, साशंक असत, तेथे सुध्दा या निर्देशांकाचा वापर करता येईल.

देशामधील मूलभूत समानता व किमान सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्यासाठी देशात रोजगाराच्या संधी मोठया प्रामणात निर्माण झाल्या पाहिजेत. त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्राची प्रशंसा केली. तसेच सेन याच्या मते देशात प्राथमिक शिक्षण हे मूलभूत आणि सक्तीचे झाले पाहिजे. तसेच राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी देशातील आर्थिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणली पाहिजे त्यामुळे देशातील लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त होतो.

अमर्त्य सेन यांनी आपल्या विश्लेषणात असे दाखवून दिले की, अप्रगत देशांचा आर्थिक विकास केवळ देशात मोठमोठे कारखाने उभारून होत नाही., तर त्यासाठी मनुष्यसाधनामध्ये मोठी गुंतवणूक करावी लागते. कारण त्यांच्या मते, आर्थिक प्रगतीत मनुष्य बाळाचा मोठा वाटा असतो. त्यामध्ये आयुर्मान, प्रौढ साक्षरता, शिक्षण या गोष्टीचा समावेष होतो.

अमर्त्य सेन यांनी 1981 मध्ये आपल्या प्रसिध्द केलेल्या Poverty & Famines या ग्रंथात अविकासित देशातील दारिद्रय आणि उपासमार यांचा सर्व अंगानी विचार केला त्याच्या मते अन्नधान्याच्या टंचाईपेक्षा लोकांकडे पुरेशा खरेदीशक्तीचा अभाव हे दुष्काळ व उपासमार समस्येचे मूळ कारण असून ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची संधी न मिळाल्याने त्यांना अन्नावाचून वंचित राहण्याची वेळ येते.

त्यांचे संशोधन व लिखाण भारतीय अर्थव्यवस्थेच्या त्यांनी अनुभवलेल्या वास्तव स्थितीवर आधारीत आहे. आर्थिक प्रगतीच्या विविध टप्यात मानवी चेहरा कायम ठेवण्यासाठी शासनाने शिक्षण, आरोग्य व इतर सुविधांची देशात महत्तम प्रमाणात निर्मिती करणे आवश्यक आहे हे दाखवून दिले.

**ब) कल्याणाचे निर्देशक :–** सेन यांनी कल्याणाचे निर्देशक तयार केले की जे समाजातील उत्पन्न वाटपही लक्षात घेतात त्यापैकी एक निर्देशक पुढील प्रमाणे :–

$$Yu(1-G)$$

Y= दरडोई उत्पन्न, G= गिनी सहगूणक, U=प्रमाद संज्ञा

या दृष्टिकोनानुसार उत्पन्नामुळे संधी निर्माण होतात. म्हणून उत्पन्नाला महत्त्व आहे.या अशा संधीनाच सेन यांनी क्षमता उत्पन्नाबरोबरच आरोग्य, शिक्षण यासारख्या इतर घटकांवरही अवलंबून असतात. सेन यांच्या या नव्या दृष्टिकोनाचा एवढा प्रमाण पडला की युनोने त्याचा अवलंब केला. डॉ. सेन यांनी 1990 मध्ये देशाची क्रमवारी ठरविण्यासाठी तेथील लोकांचे आयुर्मान, शिक्षण व उत्पन्न यावर आधारित युनायटेड नेशन्स ह्युमन इंडेक्स ही प्रणाली विकसित केली. United Nations Development Programme तर्फे दरवर्षी जो मानवी विकास निर्देशांक (HDI) तयार केला जातो आणि त्याच्या वार्षिक Human Development

Report मध्ये प्रसिध्द केला जातो. तो केवळ उत्पन्न विचारात घेऊन तयार न करता सेन यांनी सांगितले आरोग्य, शिक्षण इत्यादी घटक लक्षात घेऊन तयार केला जात आहे.

## दुष्काळाचे विश्लेषण :–

सेन यांनी दुष्काळाची मीमांसा त्यांच्या Poverty and Famines (1981) या ग्रंथात सविस्तर पणे चर्चा केली आहे. हे त्याचे विश्लेषण 1940 नंतरच्या भारत ( बंगाल ) आणि सहारा देश यातील भिषण दुष्काळाच्या अनुभनिष्ठ (Emperical) अभ्यासावर आधारीत असल्याने वस्तूनिष्ठ आहे. या लेखात दोन मुद्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. एक म्हणजे देशातील दुष्काळी व उपासमारीच्या परिस्थितीचे यथायेग्य आकलन होण्यासाठी केवळ अन्नधान्याचा पुरवठा किंवा उपलब्धता या एकाच घटकाचा विचार न करता समाजातील विविध गटांवर परिणाम करण्याऱ्या विविध सामाजिक आणि आर्थिक घटाकांचे सखोल विश्लेषण करणे जरूरीचे आहे, यावर सेन यांनी आपल्या ग्रंथात भर दिला आहे. कारण हे घटकच त्या गटांना मिळणाऱ्या संधी, यावर सेन यांनी आपल्या ग्रंथात भर दिला आहे. कारण हे घटकच त्या गटांना मिळणाऱ्या संधी, त्यांची क्षमता ठरवीत असतांत. दुसरा मुदा म्हणजे अशा दुष्काळी व उपासमारीच्या परिस्थितीत सरकारने केवळ बघण्याची भूमिका न घेता भक्कम अशी सरकारी उपाययोजना केली पाहिजे.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या नव्या दृष्टीकोनातून स्वावलंबनाच्या दिशेने भारतीय शेतकरी कामगाार यांचे हित कशामध्ये आहे त्या दृष्टीने अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केला आहे. भारतीय शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे पावसाळी अतिवृष्टी, अनावृष्टी यामुळे दुष्काळ हा मानवनिर्मीतच आहे. असा स्पष्ट सिध्दांत जगातील आणेवारीचा अभ्यास करून अमर्त्य सेन यांनी मांडला.

डॉ. सेनच्या मते दुष्काळ हा केवळ अन्नधान्याच्या तुटवडयामुळेच होत नसून अन्धान्याच्या यंत्रणामधील विषमतेतुळेही तो होऊ शकतो. शहरामधून निर्माण झालेली आर्थिक तेजी आणि त्यामुळे वाढलेल्या अन्नधान्याच्या किंमती यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे शक्य असते. बंगालमध्ये त्यावेळी अन्नधान्याचा साठा पुरेसा होता. परंतु साठेबाजीमुळे धान्य महाग झाले. परिमाणतः सामान्य लोकांना ते खेरेदी करणे अशक्य झाले त्यामुळे लोकांची उपासमार झाली, लोकांची खरेदी शक्ती वाढल्यास दुष्काळ व उपासमारीच्या संकटावरही मात करता येईल.

## कल्याणकारी उपायोजना :–

अमर्त्य सेन यांनी मानवी कल्याणासाठी अनेक उपाय सुचविले आहेत ते पुढीलप्रमाणे

1) आरोग्याची पातळी उंचावणे.
2) शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणे.
3) स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने शिक्षणाच्या व इतर संधी मिळवून देणे.
4) जमीन सुधारणाचा कार्यक्रम राबवून शेती कार्यक्षम करणे.

## सामाजिक क्षमता संधी

डॉ. सेन असे म्हणतात की, लोकांच्या क्षमता वाढवावयाच्या असतील तर त्यांचे हक्क आबाधित राहिले पाहिजे व ते बजावण्याचे स्वातंत्र्य आणि योग्य त्या सोयी सुविधा देणे आवश्यक आहे उदा. लोकांना मतदानाचा निव्वळ हक्क देऊन उपयोग नाही, त्यांना तो बजावण्याचे योग्य व चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांनी विकसनशिल देशातील लिंगभेद, दुष्काळ, दारिद्रय व आर्थिक विषमता यासारख्या मुलभूत समस्येवर आपले विचार स्पष्ट केले. आर्थिक विकास प्राप्त करण्याकरिता शिक्षण, सार्वजनिक आरोग्य ह्यासारख्या क्षेत्रात मुलभूत सुधारणा घडवूण आणल्या पाहिजेत.

लोकांची काम करण्याची क्षमता वाढून आर्थिक विकास साध्य करण्यास मदत होते. पण लोकांच्या खरेदी शक्तीमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी देशामध्ये मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती करून रोजगाराच्या मोठया प्रमाणात संधी प्राप्त करून दिल्यास लोकांची क्रयशक्ती वाढते. डॉ. सेन आरोग्य, आहार व शिक्षणाला महत्व देतात.

## तत्वज्ञान व अर्थशास्त्र :–

डॉ. सेन यांनी वेळेचा विचार केला आणि स्वतंत्र चार वर्ष मुलगामी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याचे ठरविले. त्यांना तर्कशास्त्रातही आवड होती. त्यामुळे नैतीक आणि राजकीय तत्त्वज्ञानात सहभागी झाले. तत्त्वाज्ञानाचा प्रमुख वापर केला जातो. त्यामुळे नैतिक तत्वज्ञान आकर्षिक करते. डॉ. आमर्त्य सेन यांना अर्थशास्त्र व तत्त्वज्ञानात विशेष आवड होती सेनच्या मते जॉन रावल, यशचा बर्लिन, बर्नार्ड विल्यम्स, रोनाल्ड डॉरकिन याचे काम बहूमोल आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचे अध्ययन करण्याकरिता एक संधी आहे. असे डॉ. सेनचे मत होते.

## शैक्षणिक, नैतिक व मानवी मूल्याची जोपासना :–

डॉ. अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कारसह भारतरत्न अमेरिका, फ्रान्ससह विविध देशातील शंभरहून अधिक पुरस्कार लाभलेले आहेत. अमर्त्य सेन यांनी आगदी आरंभापासून अर्थशास्त्रीय सिध्दांताचा मानवी कल्याणासाठी पुरस्कार केला.

विद्वानांनी सत्य जगासमोर मांडले पाहिजे. कोणत्याही सत्तेची भिती न बाळगता सत्यचा पुरस्कार केला पाहिजे. या प्राचीन भारतीय परंपरेनुसार वागण्याचे भान डॉ. सेन यांना आहे. ही खूप आनंदाची गोष्ट आहे. गेल्या अनेक वर्षापासून डॉ. सेन यांनी बौध्दिक वाद – विवादाची गरज किती महत्वाची आहे हे जगासमोर मांडले आहे.

बुध्दकाळपासून भारतात सुरू असलेल्या बौध्दिक वादाच्या परंपरेचा मानवी विकास प्रक्रियेत किती मोलाचा वाटा आहे. हे डॉ. सेन यांनी आवर्जून सांगितले होते. अर्थात डॉ. सेन यांची भूमिका लोकशाही हिताला प्राधान्य देणारी आहे.

भ्रष्टाचार संपविण्यासाठी आपल्याला शैक्षणिक, नैतिक आणि मानवी मूल्याची जोपासना आणि संवर्धन करणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल.

## निष्कर्ष (Conclusion ):-

1) डॉ. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील योदान सर्वात मौलिक व महत्वपूर्ण आहे.
2) डॉ. अमर्त्य सेन यांनी बहूमताचा नियम, व्यक्तिमात्राचे हक्क आणि व्यक्तीचे कल्याण यासारख्या समस्याचा उदापोह केला असून त्यातील तत्वज्ञानानुवर्ती प्रकरणांनी आदर्शानुसार आर्थिक विश्लेषणाला एक नवीन दिशा दिली आहे.
3) डॉ. सेनच्या मते, भ्रष्टाचार संपविण्यासाठी आपल्याला शैक्षणिक, नैतिक आणि मानवी मूल्याची जोपासना आणि संबर्धन करणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल.
4) दारिद्रय व सामाजिक कल्याण यांचा निकटचा संबंध असतो मात्र जेव्हा समाजातील जास्तीत जास्त लोकांच्या गरजा पूर्ण होत नाहीत तेव्हा दारिद्रयाची निर्मिती होते.
5) डॉ. सेन यांनी सुचविलेले दारिद्रयाचे निर्देशक म्हणजे समाजाची उत्पन्न पातळी, उत्पन्न व संपत्तीचे वाटप होय.

## समारोप :–

सेन यांच्यावर टीका होत असली तरी कल्याणाच्या अर्थशास्त्राला त्यांनी नवा अर्थ, नवी दिशा दिली. तसेच शास्त्राला तात्विक आणि नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. समाजरचनेच्या उतरंडीतील अगदी तळाशी असलेल्या दारिद्रय, बेकारी, उपासमार यांच्या गर्तेत व अंधकारात वर्षानुवर्ष खितपत पडलेल्या मनुष्य नावाच्या प्राण्याबदल कल्याणाच्या अर्थशास्त्राला पाझर फुटला आणि त्याने प्रकाशाचा एक किरण त्याच्यामार्फत पोहोचवून त्याचे जीवन उजळविले तरी त्या शास्त्राने आपले नाव सार्थ केल्यासारखे होईल.

**थोडक्यात,** अमर्त्य सेन यांनी कल्याणाचा विचार करताना दुष्काळ, सामाजिक निवड, साक्षरता, शिक्षण, आरोग्य व आहार, दारिद्रय आणि सामाजिक क्षमता इत्यादी बाबी लक्षात घेतल्या आहेत. कल्याणाच्या अर्थशास्त्राला नविन दिशा देणारे एक अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. अमर्त्य सेन यांची ख्याती आजही व भविष्यातही राहणार यामध्ये कोणतेही दुमत नाही.

## संदर्भ सुची :–


1) प्रा. डॉ. यशवंत रारावीकर, नोबेल अर्थशास्त्रज्ञ, डायमंड पब्लिकेश, पुणे (जाने. 2008) पृष्ठ 1 ते 11
2) डॉ. बी.डी. कुलकर्णी / डॉ. एस. व्ही. ढमढेरे, आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे ( ऑगस्ट 2008), पृष्ठ 293– 301.
3) रायखेलकर ए. आर./ दामजी बी. एन. आर्थिक विचारांचा इतिहास., विद्या बुक्स पब्लिकेशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद. ( जून – 2001). पृष्ठ 351 ते 359
4) अर्थसंवाद, जुलै सप्टेंबर 2016 / खंड 40, अंक 2, पृष्ठ 127 ते 132
5) Nobel Prize Dr.Amartya Sen.
6) www.nobelprizedr.amartya Sen.in
7) Nobelprizedr. amartyasenwikipedia.


LBP PUBLICATION